रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाकडून
देण्यात येणाऱ्या योग्यता प्रमाणपत्राबाबत.

# महाराष्ट्र शासन

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.**

**शासन निर्णय क्र.एसपीबी-२०१६ / प्र.क्र.२४४ / सां.का.१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ : शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.एसपीबी-२०१०/प्र.क्र.२९१/सां.का.१, दि.१२ ऑक्टोबर, २०१०

**प्रस्तावना :**

सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाच्या संहिता तपासून त्यात काही आक्षेपार्ह बाबी नसल्याची खात्री करून संहितांना योग्यता प्रमाणपत्र देण्याचे काम रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळामार्फत करण्यात येते. यासाठी मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांचा आढावा घेवून ज्या बाबींसाठी योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही त्या बाबी वगळता ज्या बाबींसाठी योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे त्या बाबी स्पष्ट करून "Ease of doing business" अंतर्गत मंडळाच्या कामकाजात सुलभता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

विचारांती या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात येते की, "सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशे धरून सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग यांना अनुज्ञप्ती देणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, नियम १९६०" अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी होणारा कोणताही मनोरंजनाचा कार्यक्रम ज्याला संहिता आहे तसेच ज्या कार्यक्रमांना संहिता नाही तथापि, निश्चित केलेले निवेदन / सारांश (Synopsis) आहे अशा कार्यक्रमांना रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मंडळाची मान्यता / योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असलेल्या बाबी पुढील प्रमाणे :-

| अ. क्र. | मंडळाची मान्यता / योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असलेल्या बाबी |
|---|---|
| १ | नाटक : प्रायोगिक / व्यावसायिक |
| २ | एकांकिका |
| ३ | लोकनाटय ( २ किंवा ३ अंकांसाठी ) |
| ४ | तमाशा वग |
| ५ | संगीतबारी मराठी गीते |
| ६ | मेळे |
| ७ | प्रमाणपत्राची नक्कल |
| ८ | संबंधित व्यक्तींना नाट्यसंहिता उपलब्ध करून देणे |
| ९ | शीर्षक बदल |
| १० | पुरस्कार वितरण सोहळयामध्ये होणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांची संहिता (Script) तसेच निवेदन / रुपरेषा / सारांश (Synopsis). |
| ११ | जे मनोरंजनाचे कार्यक्रम सार्वजनिक ठिकाणी सादर केले जाणार आहेत व ज्यांना संहिता अथवा सारांश (Synopsis) / निवेदन / निश्चित रुपरेषा आहे असे सर्व कार्यक्रम. |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली यादी ही सर्वसमावेशक नाही कारण, भविष्यात विविध नाविन्यपूर्ण असे मनोरंजनाचे कार्यक्रम सार्वजनिक ठिकाणी आयोजित केले जातील. त्यामुळे कार्यक्रमाचे आयोजन करताना, **कायदयाचे उल्लंघन होणार नाही / राज्याची सुरक्षितता, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नितीमत्ता यास बाधा येणार नाही / न्यायालयाचा अवमान होणार नाही** हा योग्यता प्रमाणपत्र देण्यामागील मूळ उद्देश विचारात घेऊन, सार्वजनिक ठिकाणी होणारा कोणताही मनोरंजनाचा कार्यक्रम ज्यास संहिता (Script) आहे अथवा कार्यक्रमास निवेदन / सारांश (Synopsis) आहे अशा कार्यक्रमांना रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक नसलेल्या बाबी |
|---|---|
| १ | शाळा व कॉलेजचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम |
| २ | वाद्यवृंद मराठी, हिंदी व इतर भाषिक वाद्यवृंद |
| ३ | हॉटेल, बार, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी चालणारे वाद्यवृंद. (एक वर्षासाठी) |
| ४ | सप्ततारांकित हॉटेल ३ स्टार / ४ स्टार / ५ स्टार/ क्लब / जिमखाना या ठिकाणी चालणारे मनोरंजनाचे कार्यक्रम. |
| ५ | जादूचे प्रयोग, रासलीला, रामलीला. |
| ६ | गरबा, रास दांडिया |
| ७ | हॉटेल व्यवस्थापनाचा एक दिवसाचा चालणारा मनोरंजनाचा कार्यक्रम. (उदा. बर्थ डे पार्टी / मॅरेज पार्टी) |
| ८ | कवी संमेलन, किर्तन, गायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कौशल्य स्पर्धा. |
| ९ | आरोग्य, शैक्षणिक व स्पर्धापरीक्षा इत्यादींचे मार्गदर्शन वर्ग / शिबिरे. |
| १० | मुंबई सिनेमा नियम १९५४ अंतर्गत परवाना घेण्यात आलेल्या बाबी. |

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१०२४१६२८११०५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aabafa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2017.10.27 18:04:57 +05'30'

**( प्र.म. महाजन )**

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र.

७. सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व परीक्षा) एक, महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक, महाराष्ट्र, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र.
१३. गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती - सां.का.१.